**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –2, March – 2011**
**ISSN:-** 2230-7850

Available online at www.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# भिजकी वही (2005) – अरुण कोल्हटकर

**प्रा. गणपत हराळे**
**साहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,**
**नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉ़लेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स, सांगली**

***प्रस्तावना –***

'भिजकी वही' हा अरुण कोल्हटकरांचा 2003 साली प्रकाशित झालेला कवितासंग्रह आहे. 'भिजकी वही' मध्ये मानवी इतिहासातील अमानुषता, धर्मांधता, कौर्य, हिंसा, रक्तपात, सार्वत्रिक अशांतता, स्त्रियांची अवहेलना, सांस्कृतिक अधःपतन यातले नाट्य आणि कारुण्य यांचे दर्शन अरुण कोल्हटकरांनी 'भिजकी वही' या कवितासंग्रहाला अनन्यसाधारण महत्व आहे. 'भिजकी वही' मध्ये फक्त 25 कविता असून त्यांची पृष्ठसंख्या 393 इतकी आहे. या कवितांचा निश्चित रचनाकाल माहित नाही. परंतु 'भिजकी वही' या नावावरुन ही रचना दीर्घकाळ चाललेली असावा असा तर्क बांधता येतो. भिजकी वही ही तुकारामांच्या गाथेप्रमाणेच स्वतःच्याच डोहातून वर येऊन टिकून राहिलेली कविता आहे.

'डोहाळगाणं,' 'पो–च्यु–ई,' 'किंकाळी', 'दृष्टमध' आणि 'शेवटचा अश्रू' या पाच मालाकविता आहेत. या कवितांमधून एका व्यापक अनुभवाची सगळी परिमाणे आणि एकंदरीत जीवन व्यवहाराच्या विभिन्न पैलूंचे दर्शन घडविलेले आहे. अरुण कोल्हटकरांची कविता खऱ्या अर्थाने विश्वात्मक झालेली आहे. 'भिजकी वही' मध्ये कवितांना असणारे संदर्भ हे वैश्विक पातळीवरील आहेत. होमच्या 'इलियड' मधील बहुविध स्त्रीपुरुष व्यक्तिरेखांच्या शोकांतापासून ते आधुनिक महायुध्दातील बेबंद विनाशापर्यंत आणि ब्राम्हण ग्रंथातील कथेपासून ते बाबरी मशिदीपर्यंतच्या अनुषंगाने घडलेल्या दंगलीपर्यंत नानाविध घटनाप्रसंगांचे, व्यक्तींचे संदर्भ, चिनी–जपानी संस्कृतीचे संदर्भ, रशियन उलथापालथीचे संदर्भ, स्त्रियांवरील अत्याचारांचे संदर्भ असे अनेकविध संदर्भ या कवितेमध्ये आलेले आहेत. या कवितेमुळे मराठी कवितेची कक्षा, सीमारेषाच बदलून टाकलेली आहे. अरुण कोल्हटकरांनी भिजकी वही मध्ये व्यक्तिगत भावनांची अभिव्यक्ती करणारी भावकविता, सामाजिक कविता, निसर्गकविता, प्रेमकविता इत्यादी वर्गांपलीकडे जाणारी अलिप्त व वरवर अनुत्कट भासणारी तरीही जिव्हारी जाऊन झोंबणारी कविता सादर केलेली आहे.

'भिजकी वही' मधील कविता या सर्व मानवजातीसाठी करुणेचे वरदान मागणारी कविता आहे. कवी अरूण कोलटकर म्हणतात –

> ही वही कोरडी नकोस ठेवू
> माझी वही भिजो
> शाई फुटो
> ही अक्षरे विरघळोत
> माझ्या कवितांचा लगदा होवो
> या नदीकाठचं गवत खाणाऱ्या म्हशींच्या दुधात
> माझ्या कवितांचा अंश सापडो.

ही कविता पसायदानाच्या वळणावर जाणारी प्रार्थना आहे. या कविता संग्रहातील पहिल्या ओळीपासून शेवटच्या ओळीपर्यंत सगळ्या कविता माणसाविषयीच्या विशाल करुणा आणि आध्यात्मिक अंतःस्वर यांनी व्याप्त आहेत.

'भिजकी वही' मधून मानवी कारुण्याचा अखंड स्त्रोत झिरपत राहतो. या संग्रहातील पहिली कविता. 'अश्रू' ही असून शेवटची कविता 'अखेरचा अश्रू' या नावाची आहे. 'कोणत्या क्रौंचासाठी स्त्रवताहेत हे अनुष्टुभ अश्रू' (पृ.11) असे अश्रूचे संदर्भ त्यांच्या कवितेत सातत्याने येत राहतात. अरुण कोल्हटकरांनी 'भिजकी वही' मध्ये स्त्रियांच्या सर्वगामी वेदनांचा वेध घेतलेला आहे. 'मेरी लैला', 'अपाला कसांड्रा', 'विपाशा', 'हेलन', 'कण्णगी', 'मैमून', 'हाडम्मा', 'रजनी',

'किम' इत्यादी कवितामूधन स्त्रियांच्या दुःखाचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून शोध घेतलेला आहे. मानवी सृष्टीच्या आरंभापासून पुरुष वर्गाकडून होत आलेली स्त्रीची उपेक्षा, देवांच्याही हातून घडलेली स्त्रीची विटंबना, स्त्रीदुःखविषयीची उदासीनता या कवितांनी अत्यंत तटस्थपणाने परंतु परिणामकारकरीतीने प्रकट केलेली आहे.

येशू ख्रिस्ताची 'माता मेरी' हिच्यावरच्या तीन कविता या कवितासंग्रहात आहेत त्यांना मिळून दिलेले 'त्रिमोरी' हे नावदेखील कवीच्या विचक्षण निर्मितिक्षमतेचा बोध घडविणारे आहे. साऱ्या जगाला ज्याच्या प्रेमाचा, मायेचा कृपाप्रसाद लाभला त्या येशूचा जन्म देणाऱ्या माता मेरीला मात्र मायलेकीतील नाते प्रस्थापित व्हायला व ते सर्व जगाला सुपरिचित व्हायला मायकेल एंजलोची वाट पाहावी लागली. मेरी मातेची ही खंत अशी व्यक्त झालेली आहे.

> ''तुझा छिन्नविच्छिन्न देह
> क्रूसावरून उतरवण्यात आल्यानंतर
> वाट पहावी लागली मला
> पंधराशे वर्षे
> तेव्हा कुठं डोळाभर पाहू शकले मी तुला
> दुःख मोकळं करुरू शकले
> तुला माझ्या संगमरवरी मांडीवर घेऊन
> मायकेल एंजलोच्या सौजन्यान(पृ.29)

अरुण कोल्हटकरांनी 'कसांड्रा' या व्यक्तिरेखेची मराठी कवितेत नवनिर्मिती करताना मूळ इतिहासाला जराही धक्का न लावता सर्वस्वी नवे परिणाम दिले आहे. 'स्त्री या वस्तूला आपण किती तुच्छ लेखतो.' (पृ.104) या पुरुषी अहंकाराची अभिव्यक्ती या कवितासंग्रहात जागोजाग झालेली आहे. 'विपाशा' या निओप्लेटॉनिक तत्ववेत्तीची उदाहरण घेता येईल. 'विपाशा' ही ग्रीक तत्वतानाच्या इतिहासातील अत्यंत प्रसिध्द विदुषी परंतु शिकवायची परवानगी नाही स्त्रीला, मग ती किती का हुषार असेना (पृ169) या वृत्तीची ती बळी ठरली.

> ''तो गुरू
> असंच म्हणतो आपण नेहमी
> 'ती गुरू'
> असं कुणी म्हटलेलं ऐकलंस का कधी तू पीटर?'' (पृ 169)

अशा पध्दतीने स्त्रीला सादैव घातक ठरलेल्या पुरूषी अहंकारी वृत्तीच्या समाचार घेतलेला आहे. विपाशाचे ज्ञानवैभव सहन न होवून तिला भर रस्त्यात विवस्त्र केले जाते. जगतं सुंदरी हेलनलाही अनेक गोष्टींचा त्रास सहन करावा लागला आहे. तसेच अलीकडच्या काळातील 'कण्णगी', 'मैमून', 'किम' अशा स्त्रियांच्या वाटेला आलेल्या वेदनांची व्यथा संबंधित कवितान मध्ये सांगितलेली आहे.

आज स्त्रीयांना अनेक संकटांना तोंड द्यावे लागत आहे. बलात्कार कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रियांच्या धिंडवडे काढणाऱ्या घटना सर्रास घडत आहेत.

> ''हुकाला टांगलेली सोलीव बकरी
> आणि कुळाचार सोडलेली
> लाज गुंडाळून ठेवलेली बहीण
> यांच्यात फरक करत नाही सुरी'' (पृ.221)

हे वर्तमानवास्तव थंड माथ्याने काव्यरुपात शब्दबध्द करण्याचे कवीचे कसब थक्क करणारे आहे. निर्घृण वातावरणात उत्पन्न होणारी निरपराध मांणसाची असहायता कोलटकर निर्मम वृत्तीने आणि म्हणूनच प्रभावीपणे मांडतात. किम, सूझन, कण्णगी, नादयजदा, आयसिस, रजनी, किंकाळी या कविता एका अर्थी उत्कट वेदनागीते आहेत. कवीचे शब्द वापरायचे तर हा प्रांत पीडेचा (पृ.302) त्यांत आक्रोश आहे परंतु आक्रस्ताळेपणा नाही. या सगळ्याच्या तळाशी अथांग मानवी करुणा आहे. सामाजिक नीतीचा आग्रह आहे. प्रत्येकाच्या अस्तित्वाबद्दल आदर आहे. प्रत्येक जीवाच्या स्वातंत्र्याची चाड आहे आणि या भावनांच्या पोटीच या कवितेतला भावोद्रेक थंडपणाने, तटस्थपणाने आणि अत्यंत

पोटतिडकीने व्यक्त होतो. 'सर्पसत्र' (पृ.331–387) ही एक विलक्षण काव्य निर्मिती आहे. साक्षात पृथ्वीमाता आस्तिकाला संहारसातत्याचा इतिहास सांगते आहे. 'अर्जुनाने केलेल्या खांडववनाच्या दहनापासून ते जन्मेजयाने आरंभलेल्या सर्पसत्रापर्यंतचा 'सूड' या एकमेव आसुरी देवतेला संतुष्ट करण्यासाठी ज्याची निर्मिती झाली आहे. असा हा सर्वथैव सिनिकल यज्ञ हे सर्पसत्र (पृ.364) पृथ्वीने आस्तिकाला हे सर्व कथन करणे ही कल्पनाच केवढी भव्य, उत्तुंग आणि नाट्यमय आहे.

''तुझ्यात दोन गोष्टी नाहीत
स्मृती
आदल्या चौकटीची
व अश्रूग्रंथी
तुला रडताना
आम्ही पाहिलेलं नाही कधी
————————
—————————
पण दुसऱ्याच्या डोळ्यातला अश्रू
कसा टिपावा
तो न पुसता न खाली पडू देता
व त्यातली प्रकाशकणिका
विझू न देता.
हे तुला चांगलं माहीत आहे.''(पृ.328)

अरूण कोलकरांच्या 'भिजकी वही' या कवितासग्रंहाबद्दल विलासं खोले म्हणतात – ''या कवितासंग्रहातील कवितांच्या रचनेचा बाज महाकाव्यात्म जाणिवेचा आहे. तो मालाकवितांच्या रचनेतून जसा प्रतीत होतो. तो आशयगर्भ, संपृक्त काव्याच्या ऐवजावरूनही स्पष्ट होतो. एकमेंकांशी संबंध जोडत जोडत सर्वांना एकवटणारी कविता असे या संग्रहाचे स्वरुप आहे. या एकवटीचे नाते आश्रू, दुःख आणि करुणेशी आहे. स्त्रीच्या उपेक्षेशी, सोशिकतेशी, वात्सल्याशी आहे. शेवटचे पसायदान परमकरुणामयी विश्वात्मकतेला उद्देशुन मागितलेले आहे. केवळ स्त्रीपुरुषांतील लिंगभेदाच्या जोरावर उसळून येणाऱ्या आक्रमतेऐवजी सर्व कल्याणाच्या विश्वात्मक भावनेशी ही अभिव्यक्ती आहे. वस्तुनिष्ठता, सबुध्दता, इतिहासाची चिंतनशील नवनिर्मिती हे महाकाव्यात्म रचनाविशेष या कवितंत आढळतात.''

अरूण कोलकरांच्या 'भिजकी वही' या सर्व कवितासंग्रहाचा सूर शोकात्म आहे. या संग्रहातील शेवटच्या कवितेतल्या शेवटच्या ओळी कवीच्या ठायी असणाऱ्या विशाल करुणेच्या आणि सृष्टीतील शुभंकर अस्तित्वावरील विश्वासाच्या घोतक आहेत म्हणूनच अरूण कोलटकर म्हणतात –
ही सगळी घाण वाहून गेली

''तुझ्या डोळ्यांतली
की विशुध्द अश्रु
एकच फक्त
शिल्लक राहील शेवटी
तेवढा मात्र जपून ठेव डोळ्यांत
तोच कामाला येईल
पुन्हा नव्यानं सृष्टी
निर्माण करण्यासाठी
अगे
विश्वात्मके'' (पृ. 393)

थोडक्यात, अरूण कोलटकरांचा 'भिजकी वही' हा कवितासंग्रह जागतिक स्वरूपाचा आहे. त्यांच्या या कवितासंग्रहामुळे मराठी कवितमच्या कक्षा रूंदावलेल्या आहेत.

**संदर्भग्रंथः**

1. कोलटकर अरूण, भिजकी वही, प्रास प्रकाशन, मुंबई – 04